EST : 1993

**ALPHA** ®

*Brand Name in Purity*

24 years of industry
## knowledge & experience
in this agriculture industry...

CELEBRATING 25 YEARS
1993-2018

## कृषी क्षेत्रात स्व:ताचा व्यवसाय सुरू करण्याची सुवर्ण संधी



# ALPHA BIO-PRODUCTS INDUSTRIES

**(Formaly Known as : ALPHA Chemicals & Pesticides)**
**Regd. Off.:** "Ashray" D.N. More Nagar, Pimpalgaon (B.)
Dist. Nashik-422 209, Maharashtra
**Fact.:** Gat No. 404, Shinde Village, Tal. Chandwad,
Dist. Nashik. (M.S)
For Consumer Contact : email : alfa_chemical@yahoo.com
Tel.: 02550- 252473 **www.alphabioproducts.com**




मागील २४ वर्षे संपुर्ण भारतात विद्राव्य खते, सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते, सेंद्रिय खते, वाढवर्धक औषधे, शेती उपयोगी केमिकल्स, सर्व प्रकारच्या पेंडी, जैवीक व हर्बल किटकनाशके, बुरशीनाशके इ. सुमारे १५० चे वर शेती उपयोगी उत्पादने विक्रित आम्ही अग्रेसर आहोत.

आता २०१८–१९ या रौप्य महोत्सवी वर्षात आम्ही पदार्पण करीत आहोत. त्यानिमित्ताने शेतकरी हा घटक केंद्रस्थानी ठेवून आम्ही काहीतरी वेगळे व भव्यदिव्य प्रमाणात करणेचे धोरण आखले आहे.त्या धोरणारला अनुसरुन आम्ही आमची सर्व उत्पादने, सेवा व तंत्रज्ञान सर्वप्रथम महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे उद्देशाने संपुर्ण महाराष्ट्रात कंपनीचे फ्रांचाईसी (अधिकृत विक्री व सेवा केंद्र) उघडणेचे ठरविले आहे.

## फ्रांचाईसी देण्याचा उद्देश:–

आम्ही गेली २४ वर्षे भारतातल्या अनेक राज्यात आमचे उत्पादनांची प्रचंड मोठी रेंज घेऊन काम करत आहोत. आमच्या कोणत्याही उत्पादनाची कोणत्याही राज्यात छोटीसी सुध्दा कोणतीही तक्रार आल्याची किंवा सरकारी तपासणीत आमच्या कोणत्याही उत्पादनाचा एकही सॅम्पल फेल झाल्याची आज अखेर एकही नोंद आमचे कंपनीचे नावावर नाही. ही आमचेसाठी अभिमानाची गोष्ट आहे. तसेच ही बाब आमचे उत्पादनांची उच्च गुणवत्ता असल्याचे सिध्द करते. आम्ही आमची उत्पादने सर्वत्र अधिकृत विक्रेत्यांमार्फत विक्री करत आहोत. परंतु कोणत्याही विभागात कोणत्याही विक्रेत्याला एजन्सी दिल्यानंतर तो कंपनीचे काही ठराविकच उत्पादने विक्री करतो. शेतकऱ्यांची आमचे उत्पादनांना मागणी असतांनाही इतर कंपन्यांनाही विक्रीचा वाटा देण्याच्या उद्देशाने किंवा जास्तीचा नफा मिळविण्याच्या उद्देशाने आमचे उत्पादनांऐवजी पर्यायी उत्पादने शेतकऱ्यांना विक्री केली जातात व आमची फिल्डवर्कची मेहनत वाया जाते व शेतकऱ्यांनाही आमची सर्व उत्पादने मिळत नाही. याचा आमचे कंपनीचे विक्रीला दरवर्षी फार मोठा फटका बसतो व नुकसान होते. म्हणून आमची सर्व उच्च गुणवत्तेची उत्पादने सर्व शेतकऱ्यांना वाजवी भावात व तंत्रज्ञानासह एकाच छताखाली मिळण्यासाठी आम्ही फ्रांचाईसी देऊ इच्छितो.

## फ्रांचाईसी मधून विक्री होणारी उत्पादने व दिल्या जाणाऱ्या सेवा

आम्ही सर्व प्रकारची विद्राव्य खते, सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते, सेंद्रिय खते, दुय्यम अन्नद्रव्ययुक्त खते, सिलिका युक्त दाणेदार व पावडर स्वरुपातील खते, सर्व प्रकारच्या पेंडी,सर्व प्रकारची वाढ वर्धक औषधे, जैविक व हर्बल प्रकारातील किटकनाशके व बुरशीनाशके, तसेच शेती उपयोगी सर्व प्रकारची संजीवके व स्पेशालीटी केमीकल्स अशा किमान १५० प्रकारच्या उत्पादनाचे स्वत: उत्पादन करतो. हि सर्व उत्पादने व त्याबरोबर विभागानुसार अत्यावश्यक स्प्रे पंप, मशिनरी, मल्चींग पेपर, शेडनेट, पॉलीहाऊस व त्याची उभारणी, तंत्रज्ञान व मटेरीयल विक्रीसाठी उपलब्ध करणार आहोत. त्या-त्या प्रत्येक क्षेत्रातील तज्ञ आमचेकडे आज उपलब्ध आहेत. तसेच या फ्रांचाईसी केंद्रामार्फत शेतकऱ्यांना त्यांचे जमिनीचे आरोग्य सांभाळण्यासाठी माती, पाणी परीक्षण, पिकांचे पान-देठ परीक्षणाची सुविधा व त्यानुसार योग्य मार्गदर्शन देणारा तज्ञ ह्या ठिकाणी उपलब्ध असेल. तसेच शेतीतील पारंपारिक पिकाऐवजी नवीन पिकांची तसेच नवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी व त्याचा वापर वाढण्याच्या दृष्टीने गरजेप्रमाणे शेतकऱ्यांचे पिकवार व सिझननुसार सेमीनार, प्रत्यक्ष पिक व तंत्रज्ञान पहाणी, देश विदेश दौरे आयोजित करण्याची सुविधा सुध्दा या ठिकाणी उपलब्ध असेल.

## शेतकऱ्यांसाठी फ्रांचाईसी केंद्राचा फायदा-

- शेतकऱ्याला आवश्यक तेच उत्पादन कंपनी भावात या केंद्रात उपलब्ध असेल.
- या केंद्रावरुन इतर कंपनीचा माल विकला जाणार नसल्याने शेतकऱ्याला आपल्याच कंपनीची ओरिजनल उत्पादने मिळतील. त्यामुळे शेतकऱ्याची फसवणुक टळेल.
- शेतीचे अद्यायावत तंत्रज्ञान व प्रत्येक पिकाची माहिती मोफत व घरपोच उपलब्ध होईल.
- एकाच छताखाली सर्व उत्पादने व सेवा उपलब्ध होतील.
- शेतकऱ्याला त्याच गुणवत्तेची उत्पादने व खते बाजारात कोणत्याही ठिकाणी इतक्या वाजवी भावात इतरत्र कोठेही उपलब्ध होणार नाहीत.
- फ्रांचाईसी केंद्राअंतर्गत येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याची पिकवार नोंद घेऊन त्याला त्या पिकाचे तंत्रज्ञान त्याच्या मोबाईलवर एका क्लिकवर आमचे ॲपमार्फत वेळोवेळी उपलब्ध करणेत येईल.
- शेतकऱ्यांना त्यांच्या शेती उत्पादनांची प्रक्रिया व मार्केटिंगसाठीही आम्ही शक्यतो सर्व मदत व माहिती देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

## आमची फ्रांचाईसी का घ्यावी

- ✻ एकाच कंपनीकडून कोणत्याही मध्यस्थाशिवाय सर्व उत्पादने व सेवा अतिशय वाजवी दरात उपलब्ध.
- ✻ संपुर्ण महाराष्ट्रातील किमान १० लाखाचे वर शेतकऱ्यांची नोंदणी व ४५०० चे वर विक्रेत्यांची नोंदणी व संपर्क असलेले प्रचंड मोठे नेटवर्क व ते हाताळण्यासाठी फक्त महाराष्ट्रासाठी नाशिकमध्ये सर्व तंत्रज्ञान युक्त स्वतंत्र संपर्क यंत्रणा.
- ✻ प्रत्येक फ्रांचाईसी सेंटरसाठी तज्ञ फिल्डस्टाफ. ✻ संपूर्ण महाराष्ट्रात सर्व सेंटर चे एकच इलेव्हेशन.
- ✻ पिकवार शेतकऱ्यांचे मेळावे व जाहिरात यामुळे कंपनीचे उत्पादनांचा प्रचार व प्रसार कंपनीमार्फत.
- ✻ परिसरातील सर्व कृषी प्रदर्शनात सहभागाची तयारी. ✻ उत्पादनांचा प्रचार, प्रसार व जाहिरात यासाठी स्वतंत्र तज्ञ स्टाफ नियुक्ती. ✻ संपुर्ण महाराष्ट्रात सर्व उत्पादने एकाच भावात विक्री. ✻ सर्व माल फ्रांचाईसी गोडावूनपर्यंत पोहच मिळेल. ✻ उधारीत विक्री नसल्याने पेमेंट बुडण्याची शक्यता नाही. ✻ सर्व उत्पादनांवर योग्यतो नफा-ठेऊन विक्री. ✻ कार्यक्षेत्रातील विक्रेत्यांना केलेल्या होलसेल विक्रीवर वेगळे मार्जीन दिले जाईल.

## फ्रांचाईसीसाठी प्राधान्यक्रम व आवश्यक बाबी:

फ्रांचाईसी योजनेत शेतकरी हा घटक केंद्रस्थानी असलेने फ्रांचाईसी देतांना शेतकऱ्यांशी जास्तीतजास्त संपर्क असलेल्या घटकांना आम्ही प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. * शेतकरी उत्पादक कंपनीला प्रथम प्राधान्य दिले जाईल. * त्यानंतर शेतकरी नोंदणीकृत गट. * त्यानंतर शेतकऱ्यांशी संपर्क असलेले शेती कन्सल्टंट. * त्यानंतर खते व औषधे विक्रेते कि जे फ्रांचाईसी सेंटर स्वतंत्र पणे व स्वतंत्र जागेत चालवु इच्छितात, त्यांना प्रधान्य दिले जाईल.

### तसेच

* फ्रांचाईसी धारक कृषी पदवी, पदवीधारक असावा किंवा शेतीतील अनुभवी असावा. * शेतकरी ग्राहकांना संपर्काचे दृष्टीने सोईच्या ठिकाणी शोरुम व गोडाऊन मिळून किमान ५०० चौ.फुट पक्के बांधकामाची नोंदणीकृत जागा स्वत:चे मालकीची किंवा भाडेतत्वाने उपलब्ध असावी. * किरकोळ विक्रीच्या उद्देशाने आवश्यक असणारी उत्पादने स्टॉक ठेवण्यासाठी किमान ५ ते ६ लाख इतकी आर्थिक गुंतवणुक क्षमता असावी. * शेतकरी व परिसरातील विक्रेत्यांशी दांडगा व घनिष्ट संबंध व संपर्क असावा. * ग्राहक हाताळणीचे योग्य कौशल्य असावे.

## फ्रांचाईसी धारकाने काय करणे अपेक्षित आहे–

- ❖ कंपनीकडून मिळणारी प्रत्येक उत्पादनाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत योग्य पध्दतीने व जशीच्या तशी पोहचविणे.
- ❖ केंद्रात इतर कोणत्याही कंपनीची उत्पादने किंवा यंत्रसामग्री विक्री करू नये.
- ❖ आपल्याच कंपनीची आवश्यक ती सर्व उत्पादने ग्राहकांना उपलब्ध करणे व गरजेइतकी स्टॉकमध्ये ठेवणे.
- ❖ पिकवार व सिझननुसार फिल्ड स्टाफ व कंपनीस कामासाठी योग्य ते मार्गदर्शन करणे.
- ❖ आपल्या संपर्कातील सर्व शेतकरी व विक्रेते यांच्याशी फील्ड स्टाफमार्फत सतत संपर्कात राहून कंपनीचे उत्पादनाची विक्री कशी वाढेल हे पहाणे.
- ❖ येणाऱ्या शेतकऱ्यांची गरज ओळखून त्याला आवश्यक ती सर्व उत्पादने विक्रीचे कौशल्य वापरावे.
- ❖ पिक सेमिनार,अभ्यास दौरे आयोजनाबाबत कंपनी स्टाफला योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य करावे.
- ❖ सेंटरची एकूण वार्षिक विक्री किमान रु.५० लाखाचे वर जाईल याची काळजी घेणे.

**आवश्यक कागदपत्रे–** * जागेचे पेपर्स– (८–अ उतारा, भाडेकरारनामा इ.) * ग्रामपंचायतचे ना–हरकत प्रमाणपत्र. * भागिदारी असलेस भागिदारी करारनामा. * आधार कार्ड. * पॅन कार्ड. * पासपोर्ट फोटो–२. * आधीचा खत विक्री परवाना असल्यास त्याची कॉपी. * शेतकरी कंपनी किंवा गट आसल्यास त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र. सभासद संख्या व यादी. * जागेचा फोटो.

## फ्रांचाईसी मिळविण्याची पध्दत

इच्छूक व्यक्तीने प्रथम कंपनीचे नाशिक ऑफीसला फोन करून आपली नोंद करावी व www.alphabioproduct.com या कंपनीचे वेबसाईटवरुन फ्रांचाईसी मिळण्यासाठीचा अर्ज नमुना डाऊनलोड करुन घ्यावा. सदर फॉर्म योग्य त्या माहितीसह भरून alphabionashik@gmail.com किंवा alphabiosales@gmail.com या पत्त्यावर इमेल करावा. आलेल्या अर्जाची वर्गवारी करुन आमचे कंपनीचे अधिकारी आपले जागेची व कागदपत्रांची पडताळणी करुन वरिष्ठांना अहवाल देतील. त्यानंतर अपणास फ्रांचाईसी देणे निश्चित केल्यास, आपणास कंपनीतून फोन येईल व त्यानंतर आपण फ्रांचाईसी डिपॉझीट रु.२५,०००/– कंपनीचे खात्यात जमा करावे. डिपॉझीट जमा झाल्यावर कंपनी सोबत करारपत्र करुन घ्यावे व खताचे विक्री परवाना काढने कामी 'O'ओ फॉर्म घेऊन आपले परवाना काढण्याची प्रक्रिया सुरु करावी. आपणास दिलेल्या डिझाईनप्रमाणे सेंटरचा बोर्ड, फर्निचर व इतर मांडणी करावी. यानंतर तत्काळ आपल्याला कंपनी फिल्ड स्टाफ दिला जाईल त्यामार्फत शेतकरी नोंदणी व जाहिरात सुरु केली जाईल. परवाना प्राप्त होताच आपणास आवश्यक तो किमान स्टॉक देऊन सेंटरचे उद्‌घाटन करुन व्यवसायाची प्रत्यक्ष सुरुवात केली जाईल.